# कार्यकारी अभियंता / ई-२ विभाग


म्हाडा MHADA

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

तळ मजला, इमारत क्र. ३४,अभ्युदय नगर,काळाचौकी, मुंबई - ३३

E-mail - rreee2mhada@gmail.com


जा.क्र. का. अभि./ई-२ विभा./ 197 /२०२६

दिनांक 07/04/2026

प्रति,

घरमालक

**श्रीमती महफुझाबाई ताहेरअली,**

**सी/ ओ एम आर परदावाला आणि इतर**

१२९, चिमना बुचर स्ट्रिट,

मुंबई - ४०० ००३

(कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नोंदीनुसार)

**विषय** :- धोकादायक उपकरप्राप्त इमारत क्र. ३१-३३, शेख हाफीझुद्दीन मार्ग, संदर्भात म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८(३)(अ) अंतर्गत कार्यवाही सुरू करण्याबाबत. [उपकर क्र. ई- ३९०३]

**संदर्भ** :- १) धोक्याची सुचना पत्र क्र.२९०० दि.२८.०५.२०२५. (ई-५५०९९११).

२) धोक्याची सुचना स्मरणपत्र-१ पत्र क्र.३३१७ दि-२०.०६.२०२५ (ई-५७९०४०३).

३) इशारा सुचना स्मरणपत्र-२ पत्र क्र.८३९ दि-२०.०२.२०२६ (ई-८४७७९४९).

महोदय,

महाराष्ट्र राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या उद्दीष्टपूर्ती कार्यक्रमांतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फ़त राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्यक्रमांत उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करणे या बाबींचा समावेश होता. त्यानुषंगाने विषयांकित इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करणेकामी मे. इम्रान एफ.एम.कुरेशी (मे.एसीई कन्सलटंन्ट) यांस पत्र क्र. १४८१, दि.२८.०२.२०२५ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

मे. इम्रान एफ.एम.कुरेशी (मे.एसीई कन्सलटंन्ट) यांनी दि. २३.०५.२०२५ रोजी विषयांकित इमारतींची संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला असून त्यानुसार इमारतीची वर्गवारी सी-१ म्हणजेच "TO BE EUACUTED/ DEMOLISH IMMEDIATELY" अशी आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्र क्र. १,२ व ३ अन्वये विषयांकित इमारतीस या कार्यालयामार्फत धोक्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

सदर सुचनांन्वये विषयांकित इमारत तातडीने निष्कासित करुन आवश्यकता असल्यास भाडेकरु/ रहिवाश्यांनी त्यांची कागदपत्रे सादर करुन म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील तात्पुरते गाळे पर्यायी निवासस्थान म्हणून प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु सदरपैकी एकाही भाडेकरु/ रहिवाशांनी त्यांचे संबंधित गाळे रिक्त केले नाहीत. सद्यस्थितीत इमारत अनिष्कासित आहे.

परिणामी, सद्यस्थितीत म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८(३)(अ) अंतर्गत विषयांकित इमारतीच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रस्तावित आहे. याकामी सदर पत्रान्वये आपणास विनंती करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी विषयांकित इमारतीतील आपल्या भाडेकरु/ रहिवाशांचा खालीलप्रमाणे तपशील व कागदपत्रे या कार्यालयास देण्यात यावीत, जेणेकरुन सदर कार्यवाही करणे सुलभ होईल.

| अ. क्र. | मूळ भाडेकरुचे नाव | संध्याच्या रहिवाश्याचे नाव | सदनिका क्र. | मजला | सदनिकेचे क्षेत्रफळ | वापर | | | मासिक भाडे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नि. | अ.नि. | मिश्र | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

याव्यतिरिक्त सदर सदनिकांबाबत चालू असलेल्या/ दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणांबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे. (याव्यतिरिक्त भाडेकरु/ रहिवाशी यांना देण्यात येणा-या भाडेपावत्यांच्या छायांकित प्रती).

वरिल माहिती येत्या १५ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध व इतर शासकीय संस्थांमार्फत प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची आपण कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू ,

कार्यकारी अभियंता

ई-२ विभाग / मुं.इ.दु व पु.मंडळ

प्रत,

- मा. मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सविनय सादर.
- मा. उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सादर.
- निवासी कार्यकारी अभियंता, मुं.इ.दु व पु.मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
- इमारतीतील भाडेकरु/ रहिवाशांच्या माहितीकरिता, इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यासाठी.